५.२० ७८-६-२४

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १९/०६/२०२४

# प्रेसनोट

दिनांक १९/०६/२०२४ रोजी मा. महापालिका आयुक्तांनी उपआयुक्त (पा.पु. व आरोग्य), सर्व प्रभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.), कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.), कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग) यांची संयुक्त बैठक घेऊन सदर बैठकीमध्ये पावसाळ्यापूर्वी शहरातील विकासकामांबाबत आढावा घेऊन सदर कामे विहित वेळेत पूर्ण करणेबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिले.

**सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र.१ ते ४ –**
प्रभाग समिती क्षेत्रातील धोकादायक इमारतींची पाहणी करून ज्या इमारती धोकादायक व अतिधोकादायक स्थितीत आहेत त्या इमारतींचे सर्वेक्षण करणे, त्यांना नोटीस देणे, सदर इमारतींचे ऑडिट करून घेणे व अतिधोकादायक असल्यास निष्कासीत करणेची कार्यवाही करणे. प्रभागातील सर्व हजेरी शेडची पाहणी करून कामावर हरज/गैरहजर पहाणे व दिर्घकालीन गैहरजर असल्यास त्यांचेवर कार्यवाही करणे. प्रभाग समिती कार्यालयांत जंतूनाशक पावडर व इतर सफाई साहित्य पुरेसे आहे का याची खातरजमा करणे. सर्व छोटे व मोठे नाल्यांची पाहणी करून त्यांचा अद्ययावत अहवाल सादर करणे व सर्व छोट्या-मोठ्या नाल्यांची सफाई त्वरीत करून घेणे.

**कार्यकारी अभियंता (पाणी पूरवठा विभाग) –**
शरातील नागरिकांना स्वच्छ पाणी पूरवठा होईल हे पाहणे, तसेच जलवाहिन्यांतील गळतीवावत त्वरीत थांबविणेबाबत कार्यवाही करणे.

**कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) –**
एम.एम.आर.डी.ए. मार्फत बनविण्यात येणाऱ्या ७ रस्त्यांची कामे लवकरात-लवकर पूर्ण करणे, रस्त्यांवरील खड्डे जीएसपीने बुजविणे व पाऊस थांबल्यावर त्यांचे डांबरीकरण करणे.

**कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग) –**
शहरातील सर्व विद्युत खांब यांची पाहणी करणे व ते सुस्थितीत करणे, विद्युत वाहिन्यांवरील अडसर येणा-या सर्व झाडांच्या फांद्यांची त्वरीत छटाई करणे.

**सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी –**
शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या फार वाढल्याने त्यांचा उपद्रव नागरिकांना होत असल्याने त्यांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत, त्यामुळे सदर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

१९/६/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.